# कार्यालय, नागपूर महानगरपालिका, नागपूर

(अग्निशमन व आणिबाणी सेवा)

छत्रपती शिवाजी महाराज, प्रशासकीय भवन, महानगर पालिका, सिव्हिल लाईन्स, नागपूर– 440001.

## माहितीचा अधिकार अधिनियम– 2005 अंतर्गत कलम 4 नुसार प्रसिध्द करावयाची माहिती.

**प्रस्तावना :–**

नागपूर नगरपालीका अग्निशमन दलाची स्थापना 1864 साली झाली, यावेळी भोसलेकालीन वाडयाला मोठी आग लागली असता, आग विझविण्याकरीता नगरपालिकाकडे अग्निशमन दल नव्हते. त्यामुळे महाल भागात 1864 पासून अग्निशामक दल स्थापन करण्यात आले. तसेच सन 1883 ला इतवारी या ठिकाणी अग्निशामक स्थानक स्थापन करण्यात आले. त्यानंतर सन 1895 साली सिताबर्डी या ठिकाणी अग्निशामक स्थानक स्थापन करण्यात आले.

कालांतराने लोकसंख्या व शहराचे क्षेत्रफळ वाढत गेल्यामुळे महाल येथील असलेले स्थानक यांचे रूपांतर सन 1927 ला सीटी फायर स्टेशन गंजीपेठ या नावाने सुरू झाले. सिताबर्डी येथे असलेले अग्निशामक स्थानक याचे रूपांतर सन 1939 ला सिव्हिल स्थानक म्हणून ओळखण्यात येवू लागले. इतवारी या ठिकाणी असलेले अग्निशामक स्थानक यांचे रूपांतर सन 1953 साली लकडगंज या ठिकाणी उघडण्यात आले. त्याचप्रमाणे नंतर सन 1962 ला पांचपावली या ठिकाणी अग्निशामक स्थानक उघडण्यात आले. सन 1968 ला न्यू कॉटनमार्केट अग्निशामक स्थानक उघडण्यात आले. सन 1994 ला सक्करदरा अग्निशामक स्थानक उघडण्यात आले. सन 2007 ला कळमना अग्निशामक स्थानक उघडण्यात आले. सन 2008 ला नरेन्द्रनगर अग्निशामक स्थानक उघडण्यात आले. व सन 2011 ला सुगतनगर अग्निशामक स्थानक उघडण्यात आले. या सर्व स्थानकांवर नियंत्रण ठेवण्याचे दृष्टीने व अग्निशमन विभागाचा प्रशासकीय कार्यभार सुरळीत चालण्या करिता प्रमुख अग्निशामक अधिकारी यांचे कार्यालयाची स्थापना करण्यात आली. प्रमुख अग्निशामक अधिकारी यांचे प्रशासकीय कार्यालय हे सिव्हिल

लाईन येथील अग्निशमन स्थानकाचे बाजुलाच स्थापन करण्यात आले असून, त्या स्थळावरून संपूर्ण अग्निशमन विभागाचा कार्यभार सांभाळला जातो.

त्याचप्रमाणे अग्निशमन सेवा देत असतांना अग्निशमन सेवेतील जवानांना अग्निशमन कार्याशी झुंज देत असतांना विरगती प्राप्त झाली, त्या निमीत्याने सर्व अग्निशमन कार्य करणाऱ्या शहिदांना पुष्पचक्र अर्पण करून आदराने रितीपूर्वक श्रध्दांजली अर्पण करण्यात येते. 14 एप्रिल हा दिवस राष्ट्रीय अग्निशमन सेवा दिन म्हणून पाळण्यात येतो, अग्निशमन सेवा दिना मागची पार्श्वभुमी अशी आहे की, 14 एप्रिल 1944 मध्ये मुंबई गोदित " एस. एस. फोर्ट स्टिकींग " या जहाजाला स्पोट होउन लागलेल्या भीषण आगीशी झुंज देतांना अग्निशामक दलाच्या 66 जवानांना हौतात्म्य प्राप्त झाले. या दिवसांचे स्मरण म्हणून अग्निशमनाचे कार्य करतांना प्राणाची आहुती देणाऱ्या अग्निशमन सेवेतील शहीदांच्या कर्तव्याची जाणीव व प्रेरणा देणाऱ्या सर्व हौतात्म्यांना या दिवशी 'श्रध्दांजली' अर्पण केली जाते. अग्निशमना बाबत जनतेमध्ये जनजागृती निर्माण करण्याच्या उद्येशाने केंन्द्रीय गृह मंत्रालयाच्या सुचनेनुसार प्रतीवर्षा प्रमाणे 14 एप्रील ते 20 एप्रिल या कालावधीत संपूर्ण राज्यात " अग्निशमन सेवा सप्ताह" पाळण्यात येतो. नागपूर महानगरपालिकेच्या अग्निशमन विभागातील अधिकारी/कर्मचा-यांनी देखील आपले कर्तव्य बजावत असतांना हौतात्म्य पत्कारलेले आहे.

## माहितीचा अधिकार अधिनियम– 2005 अंतर्गत कलम 4(1)(B) नुसार प्रमुख अग्निशामक अधिकारी कार्यालयाची स्वयंप्रेरणेने प्रकाशित / प्रसिध्द करावयाची कार्यालयात उपलब्ध माहिती.

**4 (1) (अ)** नागपूर महानगरपालिका, अग्निशमन व आणिबाणी सेवा विभागातर्फे जनतेला विभागातील इंतभूत माहिती मिळावी या करिता सोयीचे होईल अश्या रितीने अग्निशमन विभागातील अभिलेख सुचिबध्द करण्यात आलेला असून, त्याची निर्देशसुची प्रत्येकी त्या त्या जागेवर नमूद करण्यात आलेली आहे. या विभागातर्फे संपूर्ण कागदोपत्रीय अभिलेख संगणीकृत करण्याकरिता विभाग प्रयत्नशिल आहे. तसेच अशा सर्व अभिलेखाचे वाजवी कालावधीत आणि साधन संपत्तीच्या उपलब्धतेनुसार संगणीकरण, टप्प्या टप्प्याने केले जात असून, तो अभिलेख नागरीकांना पाहावयास मिळणे सोयीचे व्हावे, या उद्येशाने संपूर्ण देशातील विविध प्रणालीमध्ये नेटवर्कींग मार्फत विभागाला जोडण्या करिता, महानगरपालिकेच्या मंजुरीनुसार कार्य अभिप्रेत आहे.

4 (1) (ब) एक

**नागपूर अग्निशमन व आणिबाणी सेवा विभागाची रचना :**

प्रमुख अग्निशमन कार्यालय हे **महानगरपालिकेच्या शिव छत्रपती शिवाजी महाराज प्रशासकीय ईमारती** मध्ये मा. आयुक्त यांचे आदेशान्वये स्थापीत करण्यात आले असून यापूर्वी हे कार्यालय इंग्रज राजवटीत असलेल्या ईमारतीमध्ये सन 1939 पासून कार्यरत होते. अग्निशमन व आणिबाणी सेवा विभाग हा महानगरपालिकेचा एक स्वतंत्र विभाग असून महाराष्ट्र राज्य सरकारचे नगरविकास मंत्रालय, मंबई यांचे नियंत्रणात असलेले नागपूर अग्निशमन व आणिबाणी सेवा विभागा करिता फक्त 05 स्थानकांची मंजूरी प्राप्त आहे. व सध्यास्थितीत एकूण 08 अग्निशमन स्थानके महानगरपालिकेच्या मंजूरीने कार्यरत असून, हे सर्व स्थानक प्रमुख अग्निशमन अधिकारी यांचे नियंत्रणात आहेत. त्यावर पर्यवेक्षकीय अधिकारी म्हणून म.न.पा.चे. उपायुक्त श्री आर. झेड. सिध्दीकी हे आहेत.

वरील प्रमाणे अग्निशमन व आणिबाणी सेवा विभागात 05 स्थानकां करिता एकून मंजूर पदे 411 आहेत. त्यापैकी 149 पदे रिक्त असून 262 पदे खालील प्रमाणे कार्यरत आहेत.

अग्निशमन विभागाचा कार्यरत व रिक्त पदांची संख्या दर्शविणारा स्थिती दर्शक तक्ता (Flow Chart) महानगरपालिकेच्या संकेत स्थळावरील अग्निशमन विभागाचे टॅब वर प्रसिध्द करण्यात आला आहे.

4 (1) (ब) दोन

**नागपूर अग्निशमन व आणिबाणी सेवा विभागाचे कार्य / कर्तव्य :**

1. MMC Act.1949, No.59 कलम 285 नुसार अग्निशमन कर्मचारी आणि आवश्यक ते आगीचे बंब ईत्यादी ठेवणे.
2. MMC Act.1949, No.59 कलम 286 नुसार आगीच्या ठिकाणी अग्निशामक पथकाच्या मुख्य अधिका–याचे अधिकार.
3. MMC Act.1949, No.59 कलम 287 नुसार पोलीस आणि नगरपालिका अधिकारी व कर्मचारी यांनी अग्निशामक पथकास साहय करणे.
4. MMC Act.1949, No.59 कलम 288 नुसार अग्निशामक पथकाकडून झालेले नुकसान हे आगीमुळे झालेले नुकसान असल्याचे मानणे.
5. MMC Act.1949, No.59 कलम 288 नुसार आगीचे प्रतिवृत्त सादर करणे.
6. कार्यालय नागपूर महानगरपालिका, सामान्य प्रशासन विभागाचे आदेश क्रमांक साप्रवि / 2106 / एम. दि. 20 / 02 / 2013 अन्वये (अ) नागरीकांची सनद तयार करणे, (ब) सादरीकरणाचे टप्पे कमी करणे (क) कार्यालयीन धारिका निकाली काढणे.

7. अग्निसुरक्षा व जिव संरक्षक अधिनियम 2006 चे कलम 3 व डी.सी.आर. –2000 (नागपूर) चे कलम 6.6.2 नुसार ईमारतीचे बांधकामा करीता नकाशे तपासून मान्यता देणे.
8. विविध व्यवसायासाठी अग्निसुरक्षेच्या दृष्टीने ना–हरकत प्रमाणपत्र देणे.
9. तात्पुरते बांधकाम, मंडप, सांस्कृतीक कार्यक्रम, प्रदर्शनी करिता ना–हरकत प्रमाणपत्र देणे.
10. आगीच्या /दुर्घटनेचा अहवाल देणे.
11. अग्निशमन विभागाचे संर्वान्गीन विकासा करिता प्रस्ताव तयार करणे.
12. अग्निशमन विभागात कर्मचा–यांच्या सेवा भरती करिता प्रस्ताव मा. उपआयुक्त यांचे मंजुरी नंतर मा. आयुक्त, तथा म.न.पा. समिती कडे पाठविणे.
13. अग्निशमन वाहनावर होणारा खर्चा संबंधात अग्रीम काढून वाहन दुरूस्ती करणे.

यावरून नागपूर महानगरपालिका, अग्निशमन व आणिबाणी सेवा, विभागाचे कर्तव्य हे महाराष्ट्र महानगरपालिका कायदा–1949 नुसार सार्वजानिक लोक संस्थाचे आदेशा नुसार महाराष्ट्र शासनाचे वेळोवेळी निर्गमित होणारे आदेशा नुसार पार पाडल्या जाते. अग्निशमन व आणिबाणी सेवा विभागाचा कार्यभार हा महानगरपालिका आयुक्त यांचे सरळ नियंत्रणात येत असल्यामुळे शासनाचे प्रशासकीय कामकाजासारखे कामकाज हे महाराष्ट्र नागरी सेवा शिस्त व अपिल, वर्तणून नियमानुसार होत असते.

## नागपुर महानगरपालिका, नागपुर, अग्निशमन व आणिबाणी सेवा विभागाची पद निहाय कर्तव्य सुची खालील प्रमाणे आहे.

### प्रमुख अग्निशमन अधिकारी पदाची कर्तव्य सुची.

(अ) प्रशासकीय कर्तव्ये:–

1. सर्व प्रकारचे महत्वपुर्ण प्रशासकीय व आस्थापना विषयक कार्य पार पाडणे.
2. मा. आयुक्त / वरीष्ठ अधिका–यांनी वेळोवेळी दिलेल्या निर्देशा प्रमाणे महत्वपुर्ण सभेला उपस्थित राहणे.
3. म.न.पा. चे धोरणा प्रमाणे शहरात अग्निशमन सेवा प्रस्थापित करण्यासाठी अग्निशमन केद्रासाठी जागा निश्चित करुन मनुष्यबळ व यंत्र सामुग्रीचा

मान्यतेचा प्रस्ताव वरीष्ठ अधिकारी व म.न.पा. च्या स्थाई समीती व महा सभे पुढे मान्यता करीता सादर करुन सुसज्ज अग्निशमन सेवा प्रस्थापित करने.

4. महाराष्ट्र शासन यांचे कडुन प्राप्त होणऱ्या अग्निशमन विषयक मार्गदर्शक सुचनांनुसार अमलबजावनी करने.
5. माहितीचा अधिकार अधिनियमा अंतर्गत प्रथम अपीलीय अधिकारी म्हणुन कार्य करने.
6. म.न.पा. सीमेत घडलेल्या आगीच्या व इतर विशेष सेवेच्या घटनांचे विवरण पदाधिकारी, वरीष्ठ अधिकारी, वृत्तपत्र व संबंधितांना माहिती सादर करने.
7. मा. आयुक्तांनी वेळोवेळी सोपवीलेली कामे पार पाडने.
8. अग्निशमन विभागातील अधिकारी व कर्मचारी संबंधित अनुशासनात्मक धोरणे, गैरवर्तवणुकी बाबत निर्णय घेऊन दंडात्मक कार्यवाही करने.
9. म.न.पा. आयुक्त यांचे समक्ष आवशयक्ते नुसार आय–व्यय बाबत वार्षीक प्रावधान सादर करने तसेच शासनातर्फे कर्ज मागणी संबंधी प्रस्ताव सादर करने.
10. विभागाला लागणारे आवश्यक साहीत्य, यंत्रसामुग्री, वाहणे खरेदी संबंधात वरीष्ठ अधिकारींना प्रस्ताव सादर करने.
11. अधिकारी व कर्मचाऱ्यांच्या भरती व पदोन्नती संबंधात म.न.पा.चे नियमावली नुसार वरीष्ठ अधिकारींना प्रस्तव सादर करुन अमलबजावणी करने.
12. महाराष्ट्र महानगर पालिका अधिनियम अंतर्गत अग्निशमन विभागा संबंधीत दिलेल्या कलमा नुसार कार्यवाही करने.
13. शहर विकास नियंत्रण नियमावली, महाराष्ट्र आग प्रतिबंधक व जीव संरक्षक उपाययोजना अधिनियमा नुसार अधिकाराचा वापर करुन अमलबजावनी करने.
14. अधिनस्त अधिकारी व कर्मचारी यांचे अर्जित व वैधकीय रजेला मंजुरी प्रदान करने.

## ( क) साधारन { जनरल} कर्तव्ये:–

1. दरवर्षी विभागातील अधिकारी व कर्मचाऱ्यांचे किडा व ड्रील स्पर्धा आयोजीत करने.
2. विभागीय अधिकारी व कर्मचाऱ्यांचे मनोबल बाढवण्याच्या दृष्टीकोणतुन तज्ञां कडुन चर्चासत्र आयोजीत करने.
3. शहरातील जनतेमध्ये अग्निशमन व बचाव संबंधीत जनजागृती करुन प्रात्याक्षीकांचे आयोजन करने, तसेच अग्निशमन सेवा सप्ताह दरवर्षी साजरा करने.
4. आपदा प्रबंधना संबंधीत जन जागृतीचे कार्यक्रम राबविणे.